**महाराष्ट्र शासन**
**कुंभमेळा आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**जुनी जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, नाशिक - 422001**
**दुरध्वनी क्र. 0253-2977374 Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/ ऑक्टोंबर -इतिवृत्त/408/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
2 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
3 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
4 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
7 मा.सह आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
8 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
9 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
11 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
12 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
13 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
14 मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ नाशिक
15 मा.सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक
16 मा.सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग.
17 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.नाशिक
18 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
19 मा.कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग नाशिक
20 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
21 मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर, दक्षिण व पुर्व) नाशिक
22 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
23 मा.शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक महानगरपालिका
24 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
25 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.
26 मा.कार्यासन अधिकारी, ना.त्र्यं.कुं.मे.प्रा.कार्यालय, नाशिक
27 व इतर सर्व संबंधीत अधिकारी / यंत्रणा

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे दि.10/10/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दि.10 ऑक्टोंबर 2026 रोजी मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत पाठविण्यात येत असून इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

**आपला विश्वासु**

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 12-10-2026 18:20:50

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर..**

१) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र.

२) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.जिल्हाधिकारी, नाशिक

**नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. १०/१०/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

दि. १०/१०/२०२६ रोजी मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची आढावा बैठक व्ही.सी. / ऑनलाईन द्वारे (समिती सभागृह, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग) घेण्यात आली. बैठकीतील उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे.

कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव श्री. शेखर सिंह यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले. बैठकीच्या सुरुवातीला प्राधिकरणाच्या मागील बैठकीच्या (दि. ०८/०९/२०२६) इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. त्यानंतर अजेंड्यावरील नमूद केलेल्या विषयांवर चर्चा झाली.

मा.अध्यक्ष यांनी याबाबत नमूद केले की, यापूर्वी सूचना केल्याप्रमाणे प्रशासकीय मान्यतेपूर्वी अपेक्षित असलेल्या आवश्यक त्या सर्व पूर्तता असणे, अंदाजपत्रक सकृतदर्शनी योग्य असल्याचे खात्री करणे, कामाची द्विरूक्ती नाही याची खात्री करणे, कामाची कुंभमेळासाठी निकड आहे याची खात्री करणे, इत्यादी छाननी केल्यानंतरच विषय प्राधिकरणासमोर सादर करणे अपेक्षित आहे. त्यानंतर पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

---

**भाग-१: शिखर समितीची मान्यता नसलेले विषय**

- **विषय क्र. १ - सिंहस्थ कुंभमेळा २०२७ अंतर्गत रामतीर्थ (नाशिक), कुशावर्त त्र्यंबकेश्वर येथील ध्वजारोहण सोहळा व पंचवटी येथे गोदा आरती कार्यक्रमाचे आयोजन करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत..**
    - दि. ३१/१०/२०२६ रोजी होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्याचे उद्घाटन मा. महामहिम राष्ट्रपती यांच्या हस्ते होणार असल्याने या सोहळ्यास विशेष धार्मिक व प्रशासकीय महत्त्व आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या रु. ११.१३ कोटींच्या अंदाजपत्रकावर व तांत्रिक बाबींवर (उदा. व्हीव्हीआयपी स्टेज, बॅरिकेडिंग, टेंट उभारणी) चर्चा झाली.
    - या कामातील ग्रीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करीता कोजागिरी पोर्णिमेच्या मुहुर्तावरती दि. २५.१०.२०२६ रोजी शंखनाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे व दि. ३१.१०.२०२६ रोजी संध्याकाळी गोदा महाआरती च्या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याबाबत चर्चा झाली.
    - मा. उपाध्यक्ष तथा पोलिस महानिरीक्षक यांनी नमूद केले की, मा. महामहिम राष्ट्रपती यांच्या दौ-याच्या तिन दिवसांपुर्वी सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन होणे आवश्यक आहे. (D-३ नियमानुसार) यावर कुंभमेळा आयुक्त यांनी शंखनाद कार्यक्रम हा D-५ प्रमाणे दि. २५.१०.२०२६ रोजी कोजागिरी पोर्णिमेच्या मुहुर्ताच्या अनुषंगाने आयोजित केला आहे. तसेच गोदा आरतीचा कार्यक्रम हा ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर संध्याकाळी नियोजित आहे.
    - सदर कामे तातडीने पूर्ण करण्याच्या आणि पुढील प्रक्रिया प्रचलित शासकीय नियमांनुसार कार्यवाही कार्यान्वयीन यंत्रणेकडून राबविण्याच्या अटीवर प्राधिकरणाने प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली.
- **विषय क्र. २ - विद्युत नाशिक – रामतीर्थ, पंचवटी येथील ध्वजारोहण सोहळा, श्री. गोदावरी आरती व शंखनाद या कार्यक्रमासाठीचे विद्युतीकरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत..**

बैठक- इतिवृत्त

- **चर्चा व निर्णय:** सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाने सादर केलेल्या एकूण रु. २,०५,१९,६२६/- खर्चाच्या तात्पुरत्या विद्युतीकरण प्रस्तावावर चर्चा झाली. यामध्ये विद्युत संचमांडणी, एलईडी स्क्रीन, साऊंड सिस्टीम व सीसीटीव्ही यंत्रणेचा समावेश आहे.
- विद्युत सुरक्षेबाबत आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील तसेचपुढील प्रक्रिया प्रचलित शासकीय नियमांनुसार कार्यवाही कार्यान्वयीन यंत्रणेकडून राबविण्याच्या अटीवर प्राधिकरणाने प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. ३ - त्रिंबकेश्वर — ध्वजारोहण - नविन घाट, कुशावार्ता कुंड व त्रिंबकसभा येथील कार्यक्रमासाठीचे विद्युतीकरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत..**
  - **चर्चा व निर्णय:** कुशावर्त कुंड, नवीन घाट व त्र्यंबकसभा येथील तात्पुरत्या विद्युतीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाने सादर केलेल्या एकूण रु. ७४,५०,१००/- च्या प्रस्तावाचा आढावा घेण्यात आला. भाविकांची सुरक्षा व अखंडित वीजपुरवठा यासाठी हा प्रस्ताव आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.
  - विद्युत सुरक्षा प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्याच्या तसेच पुढील प्रक्रिया प्रचलित शासकीय नियमांनुसार कार्यवाही कार्यान्वयीन यंत्रणेकडून राबविण्याच्या अटीवर प्राधिकरणाने प्रस्तावास **सर्वानुमते मान्यता** दिली.

- **विषय क्र. ४ - सिंहस्थ कुंभमेळा २०२७ अंतर्गत ध्वजारोहण सोहळया करिता त्र्यंबकेश्वर येथे VVIP हेलिपॅडचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत..**
  - **चर्चा व निर्णय:** व्हीव्हीआयपी, मंत्री महोदय व वरिष्ठ अधिकारी यांच्या सुरक्षित व जलद दौऱ्यांसाठी तसेच आपत्कालीन हवाई वाहतुकीसाठी त्र्यंबकेश्वर येथे आधुनिक तांत्रिक निकषांनुसार हेलिपॅड उभारणे आवश्यक असल्याबाबत चर्चा झाली. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभागाने सादर केलेल्या रु. २.४७ कोटींच्या प्रस्तावाचा आढावा घेतला. सदर कामाकरीता यंत्रणेने नमूद केलेल्या रक्कमेबाबत विचारणा केली व त्याची कार्यान्वयीन यंत्रणेने पुन्हा खात्री करण्याच्या मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या.
  - सदर प्रकल्पाकरीता आवश्यक जागेच्या मालकीबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली. सदरची जागा खाजगी मालकीची असल्याचे कार्यान्वयीन यंत्रणेने नमूद केले. याबाबत जमीन मालकी तपासून आणि आवश्यक त्या प्रक्रीया तातडीने पूर्ण करुन प्रकल्प पूर्ण झाल्यावर कुंभमेळा संपेपर्यंत त्याची देखभाल-दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाने करावी अशा सुचना दिल्या.प्राधिकरणानेप्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली.

---

**भाग-२: आयत्या वेळचे विषय-**

बैठक- इतिवृत्त

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी नाशिक येथील हेलीपॅडचा रक्कम रु. २.४७ कोटीचा प्रस्ताव दि. ०९.१०.२०२६ रोजी सायंकाळी सादर केला असल्याचे नमूद केले. तरी सदर प्रस्तावाची निकड लक्षात घेता सदरच्या प्रस्तावास प्राधिकरणाकडुन सर्वानुमते मान्यता देणे आवश्यक असल्याचे नमूद केले. परंतु मा. अध्यक्ष महोदयांनी नमूद केले की, सदरच्या प्रस्तावाची छाननी करणे शक्य झाले नसल्यामुळे सदर प्रस्तावाच्या तांत्रिक व प्रशासकीय बाबींची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

यापूर्वीही सूचीत केले आहेच की, बैठक लावण्याची विनंती आल्यावर बैठक त्वरीत लावली जाते आणि त्यामुळे आयत्या वेळीचे विषय शक्यतो टाळावेत.

यानंतर कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केले की, IIT Bombay या संस्थेस रु. ३.९० कोटी इतके मानधन गुणवत्ता व तपासणीकरीता मान्यतादेण्यात आली आहे. परंतु त्यांना तपासणीकरीता देण्यात आलेली कामांची रक्कम रु. १०००.०० कोटीवरुन रु. ११७५.०० कोटी झाली आहे. तरी त्यांचा एकूण प्रस्ताव ४.५९ कोटी अधिक जी एस टी

असा झाला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत विनंती केली. मा. अध्यक्ष महोदयांच्या सुचनेनुसार पुढील बैठकीत सदरची बाब घेण्यात येईल असे कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केले.

ज्या विषयांना शिखर समितीची मान्यता नाही त्या सर्व विषयांना शासनाची / शिखर समितीची कार्योत्तर मान्यता घ्यावी असे सर्वानुमते ठरले.

कुंभमेळा आयुक्त यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त केली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 10-10-2026 22:03:44

**(डॉ. प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**तथाविभागीय आयुक्त, नाशिक.**

बैठक- इतिवृत्त

# दि.१० ऑक्टोंबर २०२६ रोजीचे बैठकीस उपस्थितांची यादी

**निमंत्रित यंत्रणा :-**

१. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

२. मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक .

३. मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर. प्रतिनिधी

४. आयुक्त, नाशिक महानगरपालिका.

५. जिल्हाधिकारी, नाशिक

६. जिल्हाधिकारी अहिल्यानगर. प्रतिनिधी

७. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.

८. सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक.

९. उपसंचालक,आरोग्य विभाग, नाशिक.

१०. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.

११. अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक.

१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.

१३. सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग.

१४.मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगर परिषद.

१५.रेल्वे मंडळाने नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी.

**इतर- निमंत्रित यंत्रणा / व्यक्ती :-**

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) नाशिक.

२) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक

३) इतर संबंधीत अधिकारी